**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, SEPT-OCT, 2020, VOL- 8/61*

# झाडीपट्‌टी प्रदेशातील संगीत शिक्षणाची स्थिती, समस्या आणि उपाययोजना

**प्रा. डॉ. अस्मिता नानोटी**

संगीत विभाग प्रमुख, अशोक मोहरकर कला व वाणिज्य महाविद्यालय,

अड्याळ, ता—पवनी, जि—भंडारा महाराष्ट *ई मेल—asmitananoti1303@gmail.com*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना—**

महाराष्ट्राच्या ईशान्य दिशेला असलेल्या भंडारा, गोंदिया, चन्द्रपूर आणि गडचिरोली या चार जिल्ह्यांचा भूभाग ‘झाडीमंडळ’ किंवा ‘झाडीपट्‌टी’ या नावाने ओळखला जातो. प्राचीन काळी गोंडवाना प्रदेश म्हणून सुप्रसिध्द असलेल्या झाडाझुडपांच्या व वनराईने नटलेल्या प्रदेशालाच ‘झाडीपट्‌टी’ म्हणून ओळखले जाते. झाडीपट्‌टी हा भाग प्रामुख्याने भारताचा मध्य भाग होय. पूर्व विदर्भातील चार जिल्ह्यासह मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि तेलंगणा या तिनही राज्याच्या सीमा भागात झाडीपट्‌टीची संस्कृती प्रामुख्याने आढळून येते. धान अर्थात तांदूळ हे या प्रदेशातील प्रमुख पीक व खाद्य आहे. या भागातील भाषा, सण, उत्सव, रूढी, परंपरा, संस्कृती जवळपास मिळत्या जुळत्या आहेत. झाडीपट्‌टीच्या बोलीभाषेला ‘झाडीबोली’ असे संबोधतात. येथील विलोभनीय आणि मनाला भारणारे निसर्ग सौंदर्य मध्य भारतातील नंदनवन असल्याची ग्वाही देतात. घनदाट वनश्रीचा गालीचा पांघरलेला झाडीपट्‌टीचा प्रदेश विविध रोगांवरील रामबाण औषधांचा खजिना आहे. वैनगंगेसह वर्धा, प्राणहिता, इंद्रायणी, गाढवी, खोब्रागडी, पोटफोळी व अन्य नद्यांचा सततचा खळखळणा—या प्रवाहानी निसर्गात नादमृदंगाचे स्वर उमटतात. झाडीपट्‌टी निसर्ग संगीताने व्यापली आहे.

निसर्गाशी एकरूप असलेली झाडीपट्‌टी भागातील जनता एकमेकांच्या हातात हात घालून नव्या दिशा शोधण्याचा प्रयत्न करीत आहे. निसर्गातून निर्माण झालेल्या संगीताला विश्वव्यापी स्थान मिळाले असले तरी आपल्या वेगळ्या संगीत संस्कृतीचा वारसा जपणाऱ्या या भागात संगीत शिक्षणाची मोठ्या प्रमाणावर उणीव आहे. ही उणीव भरून काढण्याकरिता झाडीपट्‌टी भागातील विद्यमान संगीताला शास्त्रीय संगीताची जोड देणे व त्यासाठी संगीत शिक्षण देणे आवश्यक आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे—**

१. झाडीपट्‌टी प्रदेशातील भंडारा, गोंदिया, चन्द्रपूर, गडचिरोली जिल्ह्यातील शास्त्रीय संगीताचे स्थान शोधणे.

२. झाडीपट्‌टी भागातील संगीताला शास्त्रीय संगीताची जोड देणे.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

३. झाडीपट्टी भागात शास्त्रीय संगीताचे महत्व प्रतिपादन करणे.

४. झाडीपट्टी भागात शास्त्रीय संगीताची अभिरुचि वाढविणे.

५. झाडीपट्टी भागात शास्त्रीय संगीतातून रोजगार निर्मितीची साधने निर्माण करणे.

६. पशुधन आणि वनस्पतींवर शास्त्रीय संगीताचा परिणाम.

**गृहितके—**

१. झाडीपट्टी भागामध्ये शास्त्रीय संगीताचा परिचय नसणे, अल्पज्ञान, अज्ञान असणे

२. झाडीपट्टी भागात शास्त्रीय संगीताच्या अभिरुचिचा अभाव.

३. झाडीपट्टी भागात शास्त्रीय संगीताचा प्रतिकुल प्रतिसाद.

४. शालेय, कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर शास्त्रीय संगीत अभ्यासक्रमाचा अभाव.

५. शास्त्रीय संगीतातील संस्था निर्मितीचा अभाव.

**संगीताचे महत्व—**

संगीत ही विश्वभाषा आहे. खर तर संगीत हा विश्वव्यापी झालेला, मन:शांती प्रदान करणारा सर्जनशीलतेचा नित्य नवा अविष्कार करणारा उपासनेचा विषय आहे. शास्त्रीय संगीत ह्या नावातच शास्त्र आहे. सृजनशिलतेच्या दृष्टिकोनातून संगीत तळागाळापर्यंत पोहचविणे आवश्यक आहे.

संगीताची मधुरता मनुष्याचा ताण तणाव कमी करते. अवजड वस्तूंचे काम करत असतांना, शेतात रोवणी करतांना, जात्यावर दळतांना, ओवी रूपी, मंत्ररूपी काव्यरूपी गायनाने मनुष्याचे कष्ट निवारण होते. अनेक विश्रांत जीवांना, अवघ्या विश्वाला मोहिनी घालणारी ही कला आहे. संगीत ही मानवी आत्म्याची भाषा आहे. संगीतामुळे शारिरीक, मानसिक आणि आत्मिक अशा सर्व स्तरांवर बदल होउ शकतात. संगीताचे प्रादेशिक भेद असले तरी मानवी भावनांचे समुच्चय करण्याचे कार्य घडून येण्यास ते आड येत नाही हे संगीताचे वैशिष्ट्य आहे. मानवातील वंशिक, राष्टीय, भाषीक असे सर्व प्रकारचे भेद मिटविण्योच महान कार्य संगीतात आहे. भारतात अकबराच्या काळात हिंदु—मुसलमानांची मने एकत्र करण्याचे कार्य संगीताने केले आहे. संगीत सम्राट तानसेनासारखे महान संगीतज्ञ राजदरबारामध्ये सन्मानाने वावरत असत. अकबराने आपली राजधानी सोडून स्वामी हरिदासांचे गायन ऐकण्यासाठी वृंदावनाची वाट धरली. अशाप्रकारच्या ऐतिहासिक घटना संगीतामध्ये आहेत. भारत ही संतांची भूमी आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर, राष्टसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे बाबा हे सर्व संत कुठल्याही विद्यापीठात शिकले नाहीत मात्र राष्टसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे बाबा यांच्या नावाने विद्यापीठ आहेत. ही सर्व संत मंडळी त्यांच्या संगीत साधनेने आजही अजरामर झाले आहेत. हा संगीताचा होणारा परिणाम केवळ मानवावरच नाही तर पश—ुप्राण्यांवर सुध्दा होतो. मध्यप्रदेशात बैतुल जिल्ह्यातील कोठा नावाच्या गावात अशी एक गाय आहे जी संगीत ऐकल्याशिवाय दुध देत नाही. तिला संगीत ऐकवले तरच ती दुध देण्यास तयार

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

होते. मैयरचे उस्ताद बाबा अल्लाउद्दीन खां सरोद वादन करीत असतांना एक काळा सर्प येउन बसत असे व वादन थांबताच निमुटपणे निघुन जात असे. पिंज—यातील चवताळलेल्या सिंहाला पं. ओंकारनाथ ठाकुरांनी आपल्या गायनाने शांत केले. येवढे की पंडितजींच्या सांगण्यावरून पिंजऱ्याचा दरवाजा उघडला असता तो सिंह प्रसन्नचित्ताने पंडीतजींचे हात चाटायला लागला, हे तत्कालिन अनेक रसिक श्रोत्यांनी बघितले आहे. सृष्टितील कोकीळा फक्त वसंतातच गाते पण या संगीताने मात्र प्रत्येक ऋतुला वासंतिक दिलासा दिला आहे. आज संगीताचा उपयोग म्युझिक थेरपी म्हणून केला जातो. महान गायक ओंकारनाथ ठाकूरांनी डॉ. जगदीशचन्द्र बोस यांच्या प्रयोग शाळेत वनस्पतींवर प्रयोग केला. ज्या झाडांना त्यांनी भैरव राग ऐकवला त्यांच्यावर एक विशेष चमक दिसून आली. जबलपूरच्या डॉ. गोरेंनी हे सिध्द केले आहे की, रोज झाडांना तीस मिनिट संगीत ऐकविले की त्यांची वाढ जलद गतीने होउन त्यांना फळं जास्त प्रमाणात लागतात.

समाज स्वास्थ्यासाठी संगीताने फार मोठे कार्य केले आहे. संगीत श्रवणाद्वारे रोगमुक्ती ही जरी नवी कल्पना नसली तरी तिचे बरेच प्रयोग पाश्चात्य देशात आणि भारतातही झालेले आहेत. परदेशातही आपले शास्त्रीय संगीत शिकविले जाते. अमेरिकेतील तीस टक्के लोक मानसिक व्याधिने ग्रासलेले आहेत. मानसिक शांतीसाठी येथे शास्त्रीय संगीत शिकविले जाते व त्या सहायाने येथील लोक मन:शांती मिळवितात. अमेरिके सारख्या प्रगत देशात भारतीय शास्त्रीय संगीत शिकविले जाते तर भारतात झाडीपट्‌टी प्रदेशात शास्त्रीय संगीत शिक्षण कां मागे राहावे?

**झाडीपट्‌टीत शिक्षणाच्या माध्यमातून संगीत रुजवण्याची आवश्यकता व उपाययोजना—**

कृषीप्रधान भारत देशात काळ्या मातीत कस लावून मोती उगवण्याची क्षमता झाडीपट्‌टी, ग्रामिण भागातच आहे. मातीत सदोदित श्रम करणारे आमचे ग्रामिण भागातील, झाडीपट्‌टीतील नागरिक सुख—समाधानाच्या शोधात नाहीत असे नाही. त्यांच्या गळ्यात कंठ तर आहेच ना? शास्त्रीय संगीताचा चन्द्र त्या गळ्यात ओतला तर कले कलेने कां होईना संगीताचे चांदणे जरूर बहरेल!

संगीताला भाषा, धर्म, जातीचे बंधन नाही. केवळ स्वरांनी नटलेले संगीत हे जर ग्रामीण भागात सखोलतेने अभ्यासले गेले तर झाडीपट्‌टी प्रदेशच काय संपूर्ण चराचरात संगीताचे नंदनवन फुलेल. झाडीपट्‌टीतील धडपडणा—या विद्यार्थ्यांचा शोध घेतला तेव्हा असे आढळून आले की, शिक्षणासाठी वीस—पंचेवीस किलोमीटर जंगलातून पायी आणि सायकल ने प्रवास करणारे विद्यार्थी आहेत. अशा विद्यार्थ्यांना संगीतासारखा आनंददायी मानसिक आरोग्य व शरीर स्वास्थ्यावर सुदृढ परिणाम करणा—या विषयाची गरज आहे.

झाडीपट्‌टी प्रदेशाने दंडार व नाटकांच्या माध्यमातून आपली सांस्कृतिक परंपरा जपली आहे. त्यात संगीताचे विपुल बाहुल्य आहे पण त्याला शास्त्रीय संगीताचा पायाभूत आधार दिल्यास ते

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

आणखी बहरेल, फळेल, फुलेल व आनंददायी ठरेल. शास्त्रीय संगीताची महती अत्यंत विश्वासाने झाडीपट्टी प्रदेशात जर पटवून दिली तर त्यांच्या आवड निर्माण होईल. एकदा संगीताची आवड निर्माण झाली की आपण पुन्हा यशस्वी होउ हा विश्वास आपोआप वाढीस लागेल. धडपडणा—या मुलांची जिद्द आणि चिकाटी संगीत या विषयात त्यांना गोडी निर्माण करून पारंगत सुध्दा करू शकतो. अगदी बालकांपासून वृध्दांपर्यंत शास्त्रीय संगीत रुजविण्याकरिता झाडीपट्टी भागात जर सातत्याने त्या त्या गावात चर्चासत्रे, अधिवेशने, सेमिनार घेणे, छोटेखानी कार्यक्रम घेणे आवश्यक आहे. गावात कुठल्याही प्रकारचा स्टेज उपलब्ध नसतांनाही हौशीने लोक दंडार, तमाशा, नाटके, मंडई ऐकतात व बघतात. सुगीचे काम संपले की त्यांच्याकडे विरंगुळा नसतो. त्यांना करमणुकीचे साधन नसल्यामुळे व्यसनाधिनता वाढीस लागते. शास्त्रीय संगीत हे माध्यम समोर ठेवले तर त्यांच्याच्या आवड निर्माण होईल. विकासाच्या दृष्टिकोनातून जर विचार केला तर शहरांचा विकास हा झाडीपट्टी भागांच्या तुलनेत अतिशय झपाट्याने सातत्याने होउ लागला आहे. आजही झाडीपट्टीचा भाग हा विकासाच्या दृष्टिकोनातून दुर्लक्षितच राहिला आहे. त्यात शास्त्रीय संगीत वावगे कसे ठरणार? आजही काही जिल्ह्यात शास्त्रीय संगीत शालेय, कनिष्ठ विद्यालयीन व महाविद्यालयीन स्तरावर सुध्दा पोहचलेले नाही. उदाहरण द्यायचे झाले तर भंडारा जिल्ह्यात प्राथमिक शाळेपासून महाविद्यालयीन स्तरापर्यंत शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, महाविद्यालयांची एकूण संख्या तीन ते चार हजाराच्या दरम्यान आहे. यामध्ये संगीत विषय शिकविल्या जाणा—या शाळा व महाविद्यालयांची संख्या केवळ २५ ते ३० आहे. यावरून झाडीपट्टी क्षेत्रात शास्त्रीय संगीताची दिशा आणि दशा काय असाची ह्याची कल्पना येते.

शालेय स्तरावर संगीत हा विषय कला आणि कार्यानुभव असा ऐच्छिक आहे. शालेय स्तरावार शास्त्रीय संगीत अल्प प्रमाणात घेउन शालेय स्तरावील गीते जसे—स्वागतगीत, समुहगीत या प्रकारची गीते शिकविली जातात. शास्त्रीय संगीत हा विषय शालेय स्तर ते महाविद्यालयीन स्तरापर्यंत बोटावर मोजण्या इतपत शिकविल्या जातो. शास्त्रीय संगीत शालेय स्तरापासून महाविद्यालयीन स्तरापर्यत वाढविण्यास काही उपाययोजना करणे गरजेचे आहे. कोणत्याही प्रकारच्या संगीताची मूळ बैठक ही शास्त्रीय संगीताचीच असते.

संगीताचे धडे बालपणापासूनच गिरविलेत तर त्याची आवड निश्चितच निर्माण होईल यात शंका नाही. त्यासाठी संगीत हा विषय शालेय जीवनापासून सूरू करायला हवा. शाळेमध्ये इतर आवश्यक विषयांसोबत संगीत हा विषय अनिवार्य करावा. जेणे करून संगीताचे प्राथमिक धडे विद्यार्थ्यांना देता येतील व त्यांच्या मध्ये आवड निर्माण होईल. लिटिल चॅम्प्स सारख्या दूरदर्शनवरील कार्यक्रम त्यांच्यातले संगीताचे ज्ञान तेवढ्यापुरते जागृत करून मुरवून टाकण्यापेक्षा संगीत साधनेचा खरा अर्थ लहान बच्चे कंपनीच्या मर्मामध्ये घट्ट बसविणे गरजेचे आहे. दोन गाणे म्हणून किंवा

इतरांचे अनुकरण करीत गाणे गाउन हिरो होण्यापेक्षा दोन राग पांच वर्ष आळवणारे पं. भीमसेन जोशी होणे काळाची गरज आहे हे पटवून द्यावे लागेल. हिरो हा काही काळापुरता मर्यादित आहे परंतु भारतरत्न हा अमर आहे हे जेव्हा कळेल त्यावेळेस ख—या अर्थाने शास्त्रीय संगीत कळेल. एन.सी. ई.आर.टी. किंवा तत्सम शिक्षण व्यवस्थेत बसणा—या शैक्षणिक चळवळींनी संगीता संदर्भात सखोल विचार करावा आणि शालेय जीवनापासून संगीत हा विषय अनिवार्य करावा. महाविद्यालयांमध्येही संगीताच्या प्रचार व प्रसारासाठी संगीत विषय असायलाच हवा. संगीताने मन प्रसन्न होते म्हणून मोबाईल मधील गाणी आवडीने ऐकणारी मुलं शास्त्रीय संगीत कां ऐकत नाहीत त्याचे कारण आमचा त्याच्यावर भर नाही व ज्ञान नाही. खेळाच्या जगात ज्या ताकदीने आट्यापाट्या किंवा खो खो वर लक्ष वेधले गेले नाही त्यामुळेच आट्यापाट्या, खो खो मागे पडलेत. ज्यावर जास्त प्रसिध्दी त्याच गोष्टी जास्त प्रचलित होतात. शास्त्रीय संगीताच्या सीडी, कॅसेटस् यांचे भाव फार वधारलेले असतात. पं. किशोरी अमोणकर, शोभा मुद्गल, परवीन सुलतान, पं. भीमसेन जोशी या सारख्या अनेक दिग्गजांच्या शास्त्रीय संगीताच्या सीडी किंवा कॅसेट महाग असल्यामुळे सामान्य माणसाला विकत घेणे पेलवत नाहीत त्यामुळे सामान्य माणसाची शास्त्रीय संगीत ऐकण्याची भूक मंदावते. पोरी जरा जपून दांडा धर या सारखी गाणी अगदी कमी किंमतीत मिळत असल्यामुळे ती सामान्यांपर्यत पोहचतात आणि शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी व सामान्यगण आळवू लागतात, पण एखादा राग आळवत नाहीत कारण आळणवण्यासाठी त्यांना शास्त्रीय संगीत सहजपण उपलब्धच होत नाही. म्हणून शाळा महाविद्यालयांमधून शास्त्रीय संगीताचा पाया पक्का करणे गरजेचे आहे. संगीत एक संस्कार आहे. तो जर बाल्यावस्थेपासून मिळाला तर त्याचा रोजगार निर्मितीसाठी निश्चितच उपयोग होउ शकतो. संगीतातील केवळ कंठसंगीतच नव्हे तर त्याचा तबला, गीटार, बासरी, सतार, संवादिनी, व्हायोलिन यासारखे अनेक वाद्य वाजविणारे जास्तीत जास्त कलाकार निर्माण होउन संगीताचे जर महत्व कळले तर मनुष्य इतर व्यसनाधीनतेपासून परावृत्त होउ शकतो म्हणून समाजात संगीताचे स्थान असणे अत्यंत गरजेचे आहे. शासनाने जर संगीत ह्या विषयाकडे लक्ष दिले तर संगीत विषयापासून मनुष्याला रोजगार भरपूर प्रमाणात मिळू शकतो. समाजातील रोजगारासंबंधी विषयांची दरी कमी होण्यास मदत होईल. व्यवसायाभिमुख शिक्षणांमध्ये संगीत हा एक अत्यंत दर्जेदार असा विषय राहील.

हरण्याच्या विचाराने माणस कधीच जिंकत नसतात. जिंकण्यासाठी सर्वात पहिली जी आवश्यकता, पात्रता असते ती म्हणजे जिंकण्याच्या विचारांची, जिंकण्याच्या विश्वासाची! हा विश्वास निश्चितच झाडीपट्टी भागात शास्त्रीय संगीताची पाळमूळ रुजविण्यास प्रेरणादायी ठरेल!

**निष्कर्ष—**

१. झाडीपट्टी भागातील शाळा व महाविद्यालयांमध्ये संगीत विषय असणे आवश्यक आहे.

२. चर्चासत्रे, अधिवेशन सेमिनार आणि कार्यक्रम घेणे गरजेचे आहे.

३. शास्त्रीय संगीताच्या संस्था निर्माण करणे.

४. स्पर्धा घेउन लोकांना जागृत करणे.

५. गावात एखाद्या ठिकाणी एकत्र येउन विषयावर चर्चा करणे.

६. शास्त्रीय संगीताच्या ध्वनिफिती कमी किंमतीत उपलब्ध करून देणे.

**संदर्भ—**

*ओम नादब्रह्म—जानेवारी—१९९७*

*ताण आणि आरोग्य विषयक मानसशास्त्र—डॉ. बी. एन. बर्वे*

*संगीत कलाविहार—नोव्हें—१९९१*

*भारतीय संगीत एवं मनोविज्ञान—वसुधा कुळकर्णी*

*स्वरसेतू—त्रैमासिक— जानेवारी—मार्च—२००५*

*संगीत ते समाधी—मनोहर हरकरे.*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*